निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* नांदेड * परभणी * हिंगोली

* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक २९२ * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * बुधवार दि.२५ फेब्रुवारी २०२६ | * पाने-४

## उठा उठा गारपीट झाली नेत्यांनो! बांधावर जाऊन फक्त फोटोसेशनची वेळ आली

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

किनवट व माहूर तालुक्यात दिनांक २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतकऱ्यांचे अक्षरशः कंबरडे मोडले आहे. डौलाने उभी असलेली मका, ज्वारी, गहू, हरभरा ही रब्बी पिके तसेच फळबागा क्षणार्धात जमिनीवर आडव्या झाल्या. शेतकऱ्याने लेकराप्रमाणे वाढविलेल्या पिकावर निसर्गाने एका झटक्यात घाला घालत तोंडचा घास हिरावून घेतला आहे.



आधीच खरीप हंगामातील नुकसानीची भरपाई अनेक शेतकऱ्यांना अद्याप मिळालेली नाही. हजारो शेतकरी आजही त्या मदतीपासून वंचित आहेत. भरपाईचा पत्ता नाही, कर्जाचा डोंगर वाढतोय, आणि अशातच रब्बी पिकावर नैसर्गिक संकट कोसळल्याने शेतकरी पूर्णतः हतबल झाला आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासन पंचनामे कितपत तत्परतेने करेल? नुकसानीची भरपाई नेमकी कधी मिळेल? हा प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात घोंघावत आहे. शासकीय मदत ही नुकसान भरून काढण्यासाठी अपुरी असली तरी तीच त्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची शेवटची आशा असते.

मात्र काही तथाकथित नेते आणि भावी जिल्हा परिषद सदस्यांसाठी ही परिस्थिती जणू संधीच ठरताना दिसत आहे. बांधावर जाऊन शेतात उभे राहून फोटोसेशन करायचे, नंतर चार कार्यकर्त्यांसह तहसील कार्यालय गाठून निवेदन देताना फोटो काढायचा, आणि तो वर्तमानपत्रांना पाठवून प्रसिद्धी मिळवायची एवढ्यावरच त्यांचे शेतकरीप्रेम संपते. निवडणुकीच्या वेळी प्रचारासाठी दिवस-रात्र फिरणारे हेच लोक संकटाच्या वेळी एखाद्या शेतकऱ्याला स्वतःच्या खिशातून एक रुपयाही मदत करताना दिसत नाहीत, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करत आहेत.

पीक भुईसपाट झाल्यावर शेतकऱ्याच्या घरातील चुल चार दिवस पेटत नाही, लेकरांना अन्न गोड लागत नाही, घरातील वातावरण शोकमग्न होते या वेदना फोटोसेशनमध्ये कधीच दिसत नाहीत. शासनाकडून मिळणारी मदत ही जरी अपुरी असली तरी ती जगण्यासाठीचा आधार असते, आणि म्हणूनच तात्काळ पंचनामे व नुकसान भरपाईची मागणी जोर धरत आहे.

या आसमानी संकटाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनीही स्वतःच्या हिताचा विचार करून योग्य नेतृत्व निवडण्याची गरज व्यक्त होत आहे. संकटाच्या वेळी खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणारे कोण आणि केवळ प्रसिद्धीसाठी येणारे कोण याचा विचार मतदान करताना करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

दरम्यान, या नैसर्गिक आपत्तीत प्रशासन व शासन शेतकऱ्यांना कितपत दिलासा देईल, याकडे किनवट व माहूर तालुक्यातील जनतेच्या नजरा खिळून आहेत.

## धर्मादाय रुग्णालयांना आरोग्य योजना बंधनकारकच

### राज्य सरकार कायद्यात सुधारणा करणार, मुख्यमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांना एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राबविणे अनिवार्य असून त्यांनी या योजना लागू केल्याच पाहिजेत असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठणकावून सांगितले. या रुग्णालयांकडून राखीव निधीचा पारदर्शकपणे विनियोग केला जात आहे की नाही हे पाहण्यासाठी याच अधिवेशनात कायद्यात सुधारणा करण्याची घोषणाही त्यांनी मंगळवारी विधानसभेत केली.

राज्यातील खाजगी आणि धर्मादाय रुग्णालयांकडून शासकीय आरोग्य योजनांची अंमलबजाणी केली जात नसल्याबाबत भिमराव तापकीर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावरील चर्चेदरम्यान फडणवीस बोलत होते. निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी मोफत व सवलतीच्या दरात उपचार देणे धर्मादाय रुग्णालयांना बंधनकारक असूनही अनेक रुग्णालये याची अंमलबजाणी करीत नव्हती. त्यामुळे सरकारने कायद्यात सुधारण करुन सरकारी सवलती घेणे म्हणजे काय याची व्याख्या करुन सर्व ४७९ धर्मादाय रुग्णालयांना कायद्याच्या कचाट्यात आणले आहे. त्यानंतर १३४ रुग्णालये एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांची अंलबजावणी सुरु केली असून गरीब रुग्णांवर उपचार करीत आहेत. मात्र सरकारच्या या निर्णयाविरोधात साधू वासवाणी मिशन व इतर काही रुग्णालये उच्च न्यायालयात गेली असून याचिकाकर्त्यांना संबंधित प्राधिकरणाकडे सविस्तर निवेदन देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार या रुग्णालयांचे म्हणणे ऐकूण दोन महिन्यात अंतिम निर्णय घेतला जाईल असे फडणवीस यांनी सांगितले.

राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयातील राखीव खाटांचा तपशील आता सरकारच्या डॅशबोर्डवर उपलब्ध झाला असून प्रत्येक रुग्णालयात गरीब रुग्णांच्या मदतीसाठी आरोग्यदूत नियुक्त करण्यात आले आहेत. या रुग्णालयांना २ टक्के निधी गरीब रुग्णांच्या उपचारावर खर्च करणे बंधनकारक असूनही तो खर्च न करता रुग्णालयांकडून खोटी बिले दाखवून सरकारची फसवणूक केली जाते. त्यामुळे आता राखीव निधीचा पारदर्शकपणे विनियोग केला जात आहे की नाही हे पाहण्यासाठी याच अधिवेशनात कायद्यात सुधारणा करून हा खर्चाचा तपशीलही ऑनलाईन तपासण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

प्रत्येक रुग्णालयांनी त्यांचे उपचाराचे आधारभूत दर जाहीर करावेत. त्यानुसार गरीब रुग्णांवर २ टक्के निधीतून केल्या जाणाऱ्या उपचारांचा हिशेब घेतला जाईल असे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सांगितले.

## शेअर मार्केट क्रॅश, सेन्सेक्स ८०० अंकांनी कोसळला, एका तासात ४ लाख कोटी बुडाले

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** –भारतीय शेअर बाजारात सकाळच्या सत्रात सेन्सेक्स आण निफ्टी ५० मध्ये मोठी घसरण झाली. यामुळं गुंतवणूकदारांना मोठं नुकसान सहन करावं लागलं आहे. सर्वच क्षेत्रात काही गुंतवणूकदारांना नफा वसुलीचं धोरण स्वीकारल्यानं शेअर बाजार कोसळला. सेन्सेक्स ८०० अंकांनी कोसळला तर निफ्टी ५० निर्देशांक २५५०० च्या खाली आला होता. सेन्सेक्स ८०० अंकांच्या घसरणीनंतर ८२४८१ पर्यंत खाली आला होता. सर्वच क्षेत्रात विक्रीचं सत्र पाहायला मिळालं. मिड आणि स्मॉल कॅप निर्देशांक १ टक्क्यांनी घसरले.

भारतीय शेअर बाजारात मंगळवारी सकाळच्या सत्रात झालेल्या घसरणीमुळं गुंतवणूकदारांचं मोठं नुकसान झालं आहे. बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ४६९ लाख कोटींवरुन ४६५ लाख कोटींवर आलं आहे. म्हणजेच अवघ्या तासाभरात गुंतवणूकदारांनी ४ लाख कोटी कमावले.

शेअर बाजारातील घसरणीच्या कारणांचा विचार केला असता अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टानं डोनाल्ड ट्रम्प यांचा टॅरिफचा निर्णय रद्द केल्यानंतर ट्रम्प प्रशासनानं आक्रमक भूमिका घेत पुन्हा एकदा टॅरिफ लावले आहेत. व्यापार विस्तार कायदा १९६२ च्या कलम २३२ चा वापर करुन सुप्रीम कोर्टाच्या निर्णय बाजूला ठेवण्याच्या दिशेनं ट्रम्प प्रशासन पाऊल टाकणार आहे. अमेरिकन सुप्रीम कोर्टानं डोनाल्ड ट्रम्प यांनी टॅरिफचा निर्णय घेताना अधिकाराचा मर्यादेबाहेर जाऊन वापर केल्याचं म्हटलं होतं. टॅरिफ लागू करण्याचे अधिकार अमेरिकन काँग्रेसचे असून ट्रम्प यांनी स्वत: त्याबाबत निर्णय घेतले, असं म्हणत अमेरिकन सुप्रीम कोर्टानं टॅरिफ बेकायदेशीर ठरवलं होतं. यानंतर संतापलेल्या ट्रम्प यांनी सुप्रीम कोर्टावर टीका केली होती. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर ट्रम्प यांनी १५ टक्के टॅरिफ लादलं आहे.

## दक्षिणेतील राज्याचे नाव बदलणार! निवडणुकीआधी मोठा निर्णय, नव्या नावावर शिक्कामोर्तब

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली** – मंगळवारी होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत केरळचे नाव बदलून 'केरळम' करण्याच्या प्रस्तावाला केंद्र सरकारकडून मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी फोटो सेशन होण्याची शक्यता असल्याने केंद्रीय मंत्र्यांना लवकर येण्यास सांगण्यात आले आहे. विशेष म्हणजे, 'सेवा तीर्थ', नवीन पंतप्रधान कार्यालय आणि कॅबिनेट सचिवालय येथे होणारी ही पहिलीच मंत्रिमंडळ बैठक असेल.

केरळ राज्य विधानसभेने केंद्र सरकारकडे राज्याचे नाव 'केरळ' वरून 'केरळम' करण्यासाठी घटनात्मक दुरुस्ती आणण्याची विनंती करणारा ठराव मंजूर केल्यानंतर ही घडामोड घडत आहे. मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी संविधानाच्या कलम ३ अंतर्गत पहिल्या अनुसूचीमध्ये राज्याचे नाव 'केरळम' करण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी करणारा ठराव मांडला. त्यांनी सांगितले की 'केरळम' हे नाव मल्याळम भाषेत प्रचलित आहे आणि राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यापासून मल्याळम भाषिक समुदायांची एकात्म केरळची मागणी महत्त्वाची राहिली आहे.

''आपल्या राज्याचे नाव संविधानाच्या पहिल्या अनुसूचीमध्ये 'केरळ' असे नमूद आहे. ही विधानसभा केंद्र सरकारला विनंती करते की संविधानाच्या कलम ३ अंतर्गत ते 'केरळम' असे बदल करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत. तसेच, संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या सर्व भाषांमध्ये राज्याचे नाव 'केरळम' असे करावे,'' असे विजयन म्हणाले.

राज्याचे नाव अधिकृतपणे बदलण्याचा ठराव ऑगस्ट २०२३ मध्ये एकमताने मंजूर करण्यात आला होता. या ठरावात केंद्र सरकारला संविधानाच्या पहिल्या अनुसूचीमध्ये राज्याचे नाव बदलून 'केरळम' करण्याची विनंती करण्यात आली होती. तसेच, आठव्या अनुसूचीअंतर्गत सर्व भाषांमध्ये 'केरळम' हेच नाव वापरण्याची मागणीही करण्यात आली होती.

केरळ हे भारतातले देशाच्या दक्षिण टोकाला असलेले राज्य आहे. कर्नाटक व तमिळनाडू या राज्यांच्या सीमा केरळला लागून आहेत. केरळच्या पश्चिमेला अरबी समुद्र व दक्षिणेला हिंदी महासागर आहे. भारताचे सर्वाधिक हिरवाईने नटलेले राज्य म्हणून केरळचा उल्लेख होतो. केरळ राज्याची स्थापना १ नोव्हेंबर १९५६ रोजी झाली. तिरुअनंतपुरम ही केरळ राज्याची राजधानी असून राज्यातील कोची व कोळिकोड ही महत्त्वाची शहरे आहेत. मल्याळम ही राज्याची प्रमुख भाषा आहे. पर्यटन विकासाच्या दृष्टीने केरळ राज्याला मोठी गती मिळालेले आहे येथील खाद्यसंस्कृती देखील वैशिष्टपूर्ण आहे.

## अवकाळी पाऊस, गारपीटग्रस्त शेतकरी संकटात; विजय वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे सरकारला घेरले

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – काँग्रेस विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत अवकाळी पावसामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीची मदत करण्याच्या मुद्यावरून सरकारला चांगलेच कोंडीत पकडले. त्यांनी या शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याची मागणी करत धान उत्पादक शेतकऱ्यांना अद्याप बोनस मिळाला नसल्याकडेही सरकारचे लक्ष वेधले. त्यांच्या मदतीला भाजप आमदार तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवारही धावून आले.

विदर्भ आणि मराठवाड्यातील नुकसानीचा पाढा वाचताना वडेट्टीवार म्हणाले की नागपूर, भंडारा, गोंदिया, यवतमाळ तसेच मराठवाड्यातील बीड, लातूर ,नांदेड ,परभणी भागात वादळी वाऱ्यासह झालेल्या गारपिटीने ज्वारी, गहू, हरभरा ही काढणीला आलेली पिके मातीमोल झाली आहेत. आंबा आणि द्राक्ष बागायतदारांचेही अतोनात नुकसान झाले आहे. हवामान खात्याने सोलापूर, परभणी, नांदेड, धाराशीव भागात पुढील दोन दिवस पावसाचा इशारा दिला असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

मागील अतिवृष्टीची मदत अजून मिळालेली नाही, धानाला बोनस जाहीर करून देण्यात आलेला नाही आणि आता पुन्हा संकट आले आहे. सरकारने नियम-निकष बाजूला ठेवून तातडीने रोख मदत द्यावी आणि पंचनाम्यांचे केवळ आदेश न देता प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

एकीकडे अवकाळी पावसाने शेतकरी उध्वस्त होत असताना दुसरीकडे शक्तिपीठ महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या घराघरांवर नोटिसा चिकटवून दहशत निर्माण केली जात आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. शक्तिपीठ महामार्गासाठी जमीन मोजणी सुरू आहे सहजपूर-जवळा सारख्या ६०० लोकसंख्येच्या गावात १,००० पोलिसांचा फौजफाटा तैनात करून मोजणी प्रक्रिया राबवली जात आहे. हे लोकशाहीला भूषणावह नाही. धाराशीव, सांगली, कोल्हापूरसह अनेक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी २३ फेब्रुवारीला या प्रकल्पाविरोधात एल्गार पुकारला होता. हा प्रकल्प रद्द करावा, अशी जनभावना असल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले.

एकीकडे अस्मानी संकटामुळे शेतकरी खचला आहे, तर दुसरीकडे सुलतानी संकटाप्रमाणे सरकार पोलीस बळाचा वापर करून त्यांच्या जमिनी हिसकावत आहे. सरकारने याबाबत आपली भूमिका स्पष्ट करण्याची मागणी विधिमंडळ नेते विजय वडेटीवार यांनी केली. विधानसभा अध्यक्ष यांनी याची दखल घेऊन सरकारला निवेदन करण्याचे निर्देश दिले.

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी अकोला पश्चिमचे काँग्रेस आमदार साजिद खान पठाण यांना बिश्नोई गँगने दिलेल्या धमकीचा मुद्दाही यावेळी उपस्थित केला. ते म्हणाले, १७ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० वाजता आमदार साजिद खान पठाण यांना एक आंतरराष्ट्रीय कॉल आला. बिश्नोई गँगशी सबंधित शुभम लोणकर याने फोन करून आमदारांकडे १० कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी केली आणि पैसे न दिल्यास गोळ्या घालून ठार मारण्याची धमकी दिली. धमकी देणाऱ्याने अत्यंत उद्दामपणे म्हटले की, पोलिसांना सांगितले तर ते महिना-दोन महिने संरक्षण देतील, पण सहा महिन्यांनी किंवा वर्षाने आम्ही तुला सोडणार नाही, मारल्याशिवाय राहणार नाही.

वडेट्टीवार म्हणाले, राज्यात लोकप्रतिनिधीच सुरक्षित नसतील, तर सामान्य जनतेचे काय? ज्या गँगने यापूर्वी गोळीबाराच्या घटना घडवून आणल्या आहेत, त्यांच्याकडून धमकी येणे ही अतिशय गंभीर बाब आहे. धमकीचा ऑडिओ ऐकला तर अंगावर काटा येतो. साजिद पठाण यांचा कोणत्याही गुन्हेगारी क्षेत्राशी संबंध नाही, तरीही त्यांना लक्ष्य केले जात आहे. काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी मांडलेल्या या मुद्द्याची गांभीर्याने दखल घेत विधानसभा अध्यक्षांनी सरकारला निर्देश दिले की, हा विषय अत्यंत गंभीर आहे.

## सहा महिने उलटूनही हैदराबाद गॅझेटियरची कार्यपद्धती निश्चित नाही, आता नवी समिती स्थापन

### मराठा आरक्षणप्रश्नी राज्य सरकारची कबुली

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या मुंबईतील आंदोलनानंतर, राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, या ऐतिहासिक घोषणेला सहा महिने उलटूनही अद्याप प्रशासकीय स्तरावर कार्यपद्धती निश्चित झालेली नाही. ''स्पष्ट कार्यपद्धती नसल्यामुळेच कुणबी प्रमाणपत्रांसाठी कमी अर्ज येत आहेत आणि वाटपही संथ गतीने होत आहे,'' अशी धक्कादायक कबुली खुद्द सरकारने २० फेब्रुवारी रोजी काढलेल्या एका आदेशातून दिली आहे. सरकारच्या या कबुलीमुळे प्रशासकीय यंत्रणेचा ढिसाळ कारभार आणि आरक्षणाबाबतची उदासीनता चव्हाट्यावर आली आहे.

सहा महिन्यांच्या निष्क्रियतेनंतर आता सरकारला जाग आली असून, यावर मार्ग काढण्यासाठी एक नवीन विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या देखरेखीखाली ही समिती कार्यरत असणार आहे. हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे नेमकी कोणती कागदपत्रे ग्राह्य धरावीत आणि पात्रता कशी ठरवावी, याची सविस्तर कार्यपद्धती ही समिती तयार करणार आहे. ही कार्यपद्धती तयार झाल्यानंतर ती राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवली जाईल आणि त्यानंतरच खऱ्या अर्थाने प्रमाणपत्र वाटपाला वेग मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान, ''समितीमार्फत कार्यपद्धती लवकरात लवकर निश्चित केली जाईल,'' असे संकेत विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले आहेत. मात्र, ही समिती कधी अहवाल देणार आणि सरकार कधी मंजुरी देणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

डिसेंबर २०२५ मध्ये समोर आलेली आकडेवारी सरकारसाठी अत्यंत नामुष्कीची ठरली आहे. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमधून तीन महिन्यांत केवळ ५९४ अर्ज दाखल झाले होते, त्यापैकी केवळ ९८ जणांनाच प्रत्यक्षात ओबीसी प्रमाणपत्र मिळाले. म्हणजेच अर्जांचे प्रमाणही कमी आहे आणि मंजुरीचे प्रमाण त्याहूनही कमी. या आकडेवारीवरून मनोज जरांगे पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत सरकारवर टीकेची झोड उठवली होती.

सहा महिन्यांच्या दिरंगाईनंतर आता राजकीय आणि सामाजिक वर्तुळातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. ''ही प्रशासकीय दिरंगाई आहे की जाणीवपूर्वक केलेली उदासीनता?'' असा सवाल विचारला जात आहे. मराठा आरक्षणासंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी या दिरंगाईवर स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## साडेतीन कोटीची कुशल देयके प्रलंबित

### मग्रारोहयो योजनेची कामे ठप्प हजारो मजुरांचे परप्रांतात स्थलांतर, माहूरच्या पंचायत समितीत दलालांचा सुळसुळाट

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर** – दऱ्या खोऱ्यात वसलेल्या माहूर तालुक्यात कुठलाही उद्योग धंदा नसल्याने शासनाची मग्रारोहयो योजना मजुरांसाठी बेरोजगारांसाठी जीवनदायींनी ठरत असताना माहूर पंचायत समितीकडून झालेल्या कामाची गेल्या वर्षभरापासून साडेतीन कोटीची कुशल देयके प्रलंबित असल्याने तसेच नवीन कामे सुरू झालेली नसल्याने हजारो मजुरांचे स्थलांतर होत असून बेरोजगार घरदार सोडून कामासाठी वन वन भटकताना दिसत असल्याने शासनाकडून कुशल देयके तात्काळ देऊन नवीन कामे सुरू करण्याची मागणी मजूर वर्गातून होत आहे

माहूर पंचायत समिती कार्यालयात काही अधिकारी तसेच इतर कर्मचारी दलालांची भूमिका पार पाडून पैसा देतील त्यांची बीले तात्काळ काढून देण्याचा गोरख धंदा चालवत असल्याने काम करणाऱ्यांची बीले अडकली तर काम न करता बोगस हजेरीपटावर नावे टाकून विले काढणाऱ्यांचा बोलबाला झाल्याने गेल्या वर्षभरापासून सिंचन विहीर गोठा बांधकाम व इतर कामावर झालेल्या खर्चाची कुशल देखे अडकल्याने शेतकऱ्यासह मजूर वर्ग संकटात सापडला आहे

दुसरीकडे गटविकास अधिकाऱ्यांचे माहूर पंचायत समिती कडे दुर्लक्ष झाल्याने त्यांच्या हाताखालील काही कर्मचारी इतर कर्मचाऱ्यांना डावलून बीले काढण्यासाठी थेट संपर्क करा असा संदेश पोहोचवल्याने दलाला मार्फत गेलेली कामे पूर्ण होत असल्याने निष्ठावान कर्मचारी कारभाराला बगल देऊन शांत बसलेले दिसत आहे

सिंचन विहीर गोठा व इतर ३७५ कामांचे ३ कोटी ४५ लाख रुपये शासनाकडून येणे बाकी असल्याने लाभार्थ्यांच्या पंचायत समितीत चकरा मारून चपला तुटत असूनही शासनाकडून निधी प्राप्त झाला नसल्याने तसेच तुमचां निधी काढून देतो म्हणून रक्कम उकळणाऱ्या दलालांचा सुळसुळाट झाल्याने पंचायत समिती उलट सुलट चर्चेच्या गर्ते त अडकलेली आहे.



नवीन कामे सुरू नसल्याने तसेच तालुक्यात कुठलाही उद्योग नसल्याने हजारोच्या संख्येने असलेले मजूर आंध्रप्रदेश पुणे मुंबई कर्नाटक यासह ईतर राज्यात घरदार मुलाबाळांना सोडून रोजगारासाठी जात असल्याचे विदारक चित्र तालुक्यात निर्माण झाले तरीही गटविकास अधिकाऱ्यांनी व त्यांच्या वरिष्ठांनी कुठलीही कामे सुरू केली नसल्याने बेरोजगारी कर्जापायी आत्महत्या होण्याआधी तत्काळ माहूर तालुक्यात मग्रारोहयो ची कामे सुरू करावी अशी मागणी होत आहे

# राष्ट्रवादीचे भवितव्य काय?

राष्ट्रवादी काँग्रेस व पर्यायाने महाराष्ट्राचे राजकारण कुठल्या दिशेस जाणार, याबाबत सध्या संभ्रम आहे. शरद पवार सक्रिय राजकारणात राहणार का आणि सुप्रिया सुळे काय भूमिका घेणार, हे कळीचे प्रश्न आहेत. तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूच्या धक्क्यातून महाराष्ट्र अद्याप सावरलेला नाही. सुनेत्रा पवार यांनी तातडीने उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली असली तरी अजूनही बऱ्याच प्रश्नांची उत्तरे महाराष्ट्र व पर्यायाने देश शोधतो आहे. महाराष्ट्राचे राजकारण पुढे नक्की कोणत्या दिशेस जाणार, याबद्दलही अजून संभ्रमच आहे. अजित पवारांच्या अकाली जाण्याने पवार कुटुंबाला मोठा धक्का बसला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे या त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनाही तो मोठा धक्का होता. अजित पवार यांच्या मृत्यूमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात अस्थिरता येणार का, असा प्रश्न चर्चेस आला. दुसरीकडे अजित पवार आणि शरद पवार या दोघांचे पक्ष एकत्र येणार असल्याच्या चर्चेला जाहीर चालना मिळाली. तिसरीकडे अजित पवार यांचे पुतणे व आमदार रोहित पवार यांनी त्यांच्या अपघातामागे घातपात असल्याचा आरोप करताना त्याच्या सखोल चौकशीची मागणी केली. चौथ्या बाजूला महाराष्ट्रात पुढील महिन्यामध्ये राज्यसभेच्या सात जागांसाठी निवडणुका जाहीर झाल्या आहेत. राज्यसभेच्या गेल्या दोन द्वैवार्षिक निवडणुकांनी महाराष्ट्राच्या राजकारणात भूकंप घडविले होते. त्यामुळे या वेळची निवडणूक आता आणखी काय घडविते, या प्रश्नाचे उत्तर अनेक राजकीय पंडित शोधत आहेत. अजित पवार यांनी निधनापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. महापालिका निवडणुकांच्या प्रचाराच्या वेळेस त्यांनी तसे संकेतही दिले होते. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये या दोन्ही पक्षांच्या उमेदवारांनी एकाच चिन्हावर निवडणूक लढविण्याचा समझोताही झाला होता. जिल्हा परिषदेच्या निवडणुकांत तर अनेक ठिकाणी शरद पवार यांच्या पक्षाचे उमेदवार अजित पवार यांच्या पक्षाच्या चिन्हावर उभे राहिले. अजित पवार यांच्या निधनानंतर मात्र या विलीनीकरणावरून संशयाचे धुके निर्माण झाले आहे. पवार कुटुंबीयांनी याबाबत अजूनही कोणतीही स्पष्ट भूमिका घेतलेली नाही. मात्र, शरद पवार यांच्या पक्षातील अनेक नेत्यांनी हे विलीनीकरण अगदी अखेरच्या टप्प्यामध्ये होते, हे जाहीरपणे सांगितले आहे. या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी याबाबत सविस्तर लेख पक्षाच्या मुखपत्रात लिहिला. याच गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी, हे विलीनीकरण कसे होणार होते याबाबतचे तपशीलही मुलाखतींत जाहीर केले. या विलीनीकरणानंतर कोल्हे यांच्याकडेच संयुक्त पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात येणार होती, अशा बातम्याही आधीच प्रसिद्ध झाल्या. दुसऱ्या बाजूला अजित पवार यांचे निकटचे सहकारी सुनील तटकरे यांनी मात्र, असा कोणताही प्रस्ताव असल्याची व त्यावर चर्चा सुरू असल्याची माहिती आपल्याला नव्हती, असे जाहीरपणे सांगितले आहे. प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ या अजित पवार यांच्या समर्थकांनीही हीच भूमिका घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही, याबाबत अजित पवार आमच्याशी काहीही बोलले नव्हते, असे सांगून त्यांच्या गटाला अनुकूल भूमिका घेतली आहे. सुनेत्रा पवार यांनी घाईने घेतलेली शपथ हीदेखील विलीनीकरणाच्या चर्चेला पूर्णविराम देण्यासाठीच त्यांच्या समर्थकांकडून खेळलेली चाल आहे, असे भासविले जात आहे. साहजिकच यामधील संदिग्धता संपण्याचे नाव घेत नाही. नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या पदरात फार मोठे यश पडलेले नाही. पुणे व पिंपरी- चिंचवड महानगरपालिकांमध्ये एकत्र लढूनही या पक्षांना मतदारांनी कौल टाकलेला नाही. त्यामुळे शरद पवार गटाकडून विलीनीकरण करून सत्तेत सहभागी होण्यासाठीचा रेटा असल्याचे प्राथमिक चित्र उभे राहिले आहे. दुसरीकडे काहीही झाले तरी शरद पवार गटाला सामावून घ्यायचे नाही; यायचेच असले तर त्यांनी आमच्या अटींवर आले पाहिजे, अशी भूमिका अजित पवार गटाची असेल. यात, शरद पवार सक्रिय राजकारणात राहणार का आणि सुप्रिया सुळे नक्की काय भूमिका घेणार, हे कळीचे प्रश्न आहेत. शरद पवार यांच्या राज्यसभा सदस्यत्वाची मुदत एप्रिलमध्ये संपत आहे. गेली साठ वर्षे पवार निवडणुकीच्या राजकारणात आहेत. आजवर त्यांनी एकदाही पराभव पत्करलेला नाही. राज्यसभेवर पुन्हा जाण्यासाठी त्यांच्यापुढे दोन पर्याय आहेत. पहिला पर्याय म्हणजे अजित पवार गटाशी जुळवून घेऊन संयुक्त पक्षाचे उमेदवार म्हणून या निवडणुकीत सहभागी व्हायचे. अजित पवार गटाकडे चाळीस आमदार आहेत. त्यामुळे त्यांचा एक खासदार स्वबळावर सहज निवडून येईल. म्हणजे, शरद पवार विनासायास राज्यसभेत पोहचतील. मात्र हे विलीनीकरण किंवा समझोता न झाल्यास दुसरा पर्याय म्हणून पवार यांना महाविकास आघाडीकडून निवडणुकीत उतरावे लागेल. त्यासाठी त्यांना शिवसेना व काँग्रेसच्या आमदारांची मदत लागेल. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे प्रवक्ते असलेले संजय राऊत यांनी, पवारांनी पुन्हा राज्यसभेवर जावे व त्यासाठी महाविकास आघाडी तयार आहे, असे सांगितले आहे. जूनमध्ये होणाऱ्या विधान परिषदेच्या निवडणुकीमध्येही उद्धव ठाकरे यांनी उमेदवारी घ्यावी, असे सूतोवाच त्यांनी केले आहे. त्यासाठीही त्यांना काँग्रेस व राष्ट्रवादीच्या आमदारांची मदत लागेल. या बदल्यात आपल्याला काय मिळणार, यावरून काँग्रेसमध्ये अस्वस्थता आहे. विरोधी पक्षांत काँग्रेसचे संख्याबळ सर्वाधिक असल्याने राज्यसभेची एक जागा आपल्याला मिळावी, असा एक मतप्रवाह त्या पक्षात आहे. पक्षप्रभारी रमेश चेन्नितला यांना काँग्रेसच्या नेत्यांनी तशी स्पष्ट कल्पना दिली आहे. त्यामुळे काँग्रेसची समजूत घालण्याचे मोठे आव्हान पवार यांच्यासमोर असेल. अन्यथा पवार यांनी ठरविलेच तर ते त्यांच्या मित्रपक्षांच्या मदतीने इतर राज्यांतून राज्यसभेवर जाण्यासाठी प्रयत्न करू शकतील. साहजिकच निवडणुकीतील उमेदवारी ठरेपर्यंत हे सारेच चित्र अस्पष्ट राहील. उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारलेल्या सुनेत्रा पवार आजही राज्यसभेच्या सदस्य आहेत. अजित पवार यांच्या निधनाने रिक्त झालेल्या बारामती विधानसभेची पोटनिवडणूक जाहीर झाल्यानंतर महाराष्ट्रातील परंपरेनुसार बहुधा या जागेवर सुनेत्रा पवार यांची बिनविरोध निवड होईल. त्यानंतर त्या राज्यसभेचा राजीनामा देतील व त्यासाठी पोटनिवडणूक होईल. अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ हेदेखील राज्यसभा सदस्यत्वासाठी उत्सुक असल्याची चर्चा आहे. ते मार्चमध्ये होणाऱ्या निवडणुकीत उमेदवार होणार, की त्यांच्या आईने राजीनामा दिल्यावर रिक्त झालेल्या जागेवर जाणार हे स्पष्ट झालेले नाही. सन २०२९च्या मे महिन्यात होणारी लोकसभा निवडणूक ही आता महाराष्ट्रातील आगामी मुख्य निवडणूक असेल. साहजिकच सुनेत्रा पवार यांच्याकडे विचार व कृतीसाठी भरपूर वेळ आहे. पुढील तीन वर्षे त्यांना त्यांचा पक्ष सांभाळणे, त्यातील आमदारांना धरून ठेवणे व आपल्या पक्षाची प्रगती करणे ही आव्हाने असतील.

# प्रा. डॉ. स्मिता अवचार : समाजशास्त्राच्या सेवाव्रतापासून ते जीवनगौरवापर्यंत




महाराष्ट्रासह भारतातील समाजशास्त्रीय परंपरेत काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांचे कार्य केवळ विद्यापीठीय चौकटीत मर्यादित राहत नाही, तर ते समाजाच्या वैचारिक जडणघडणीचा अविभाज्य भाग बनते. अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक नाव म्हणजे प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम आहेत. समाजशास्त्र या विषयाला मानवी संवेदनशीलतेची, सामाजिक बांधिलकीची आणि शास्त्रीय काटेकोरतेची जोड देत त्यांनी जे दीर्घकालीन कार्य केले आहे, त्याची दखल घेत महाराष्ट्रातील मराठी समाजशास्त्र परिषद यांच्यातर्फे देण्यात येणारा २०२५-२६ चा जीवन गौरव पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. दि. १७-१८ फेब्रुवारी रोजी नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ संचालित, कला व वाणिज्य महाविद्यालय, सिन्नर, जि. नाशिक येथे आयोजित मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ३५व्या राष्ट्रीय अधिवेशनात हा सन्मान मराठी समाजशास्त्र परिषेदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक आणि भारतीय समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दीप्ती रंजन साहू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आणि महाराष्ट्रासह भारतातील समाजशास्त्र क्षेत्रात एक गौरवशाली क्षण नोंदवला गेला आहे.

हा पुरस्कार केवळ एका प्राध्यापिकेच्या प्रदीर्घ सेवेला दिलेली औपचारिक मान्यता नाही, तर समाजशास्त्र या विषयाच्या सामाजिक उपयोगितेला दिलेली दाद आहे. समाजातील दुर्बल, वंचित आणि दुर्लक्षित घटकांच्या प्रश्नांना संशोधनाच्या केंद्रस्थानी ठेवून समाजशास्त्राला 'माणसांशी जोडलेला विषय' बनवण्याचे कार्य प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांनी आयुष्यभर केले. त्यामुळेच जीवन गौरव पुरस्कार हा त्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा शेवट नसून, त्यांच्या सेवाव्रताची सार्वजनिक कबुली आहे.

प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचा शैक्षणिक प्रवास हा सातत्य, चिकाटी आणि समाजाभिमुख दृष्टिकोन यांचा सुंदर संगम आहे. एम.ए., एम. फिल., डी.एच.ई. आणि पीएच. डी. या शैक्षणिक टप्प्यांतून त्यांनी समाजशास्त्राच्या मूलभूत संकल्पना, सिद्धांत आणि संशोधन पद्धती यांचे सखोल ज्ञान प्राप्त केले. मात्र, त्यांच्या शिक्षणाचा उद्देश केवळ पदव्या मिळवणे हा कधीच नव्हता. समाज समजून घेणे, समाजातील प्रश्न ओळखणे आणि त्या प्रश्नांवर शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करणे, हा त्यांच्या अभ्यासाचा खरा गाभा राहिला.

समाजशास्त्र हा विषय त्यांनी केवळ सैद्धांतिक पातळीवर न ठेवता तो समाजाशी संवाद साधणारा बनवला. सामाजिक बदल, विकास प्रक्रिया, कुटुंबसंस्था, लिंगभाव, स्त्री-पुरुष संबंध, वृद्धत्व, शहरीकरण आणि ग्रामीण वास्तव या सर्व विषयांकडे त्यांनी संवेदनशीलतेने आणि वस्तुनिष्ठतेने पाहिले. त्यामुळेच त्यांचा शैक्षणिक प्रवास हा 'पुस्तकांतील समाज' आणि 'प्रत्यक्षातील समाज' यांच्यातील दरी भरून काढणारा ठरतो.

त्यांचे दीर्घकालीन अध्यापन कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथील समाजशास्त्र विभागाशी निगडित आहे. विद्यापीठीय प्राध्यापिका आणि विभागप्रमुख म्हणून त्यांनी पदव्युत्तर स्तरावर समाजशास्त्र विषयाचे अध्यापन केले. वर्गखोलीतील त्यांचे अध्यापन हे केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरते मर्यादित नव्हते, तर विद्यार्थ्यांमध्ये समाजाकडे पाहण्याची चिकित्सक दृष्टी निर्माण करणारे होते. सामाजिक घटनांचे विश्लेषण, प्रत्यक्ष उदाहरणे, क्षेत्रकार्याचे अनुभव आणि संशोधनातील शिस्त या सर्वांचा समन्वय त्यांच्या अध्यापनात दिसून येतो.

समाजशास्त्र शिकवताना त्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारायला, निरीक्षण करायला आणि निष्कर्ष काढायला शिकवले. 'समाजशास्त्र म्हणजे केवळ उत्तरांचा संच नव्हे, तर प्रश्न विचारण्याची शिस्त आहे,' ही भूमिका त्यांच्या अध्यापनातून सातत्याने व्यक्त होत राहिली. त्यामुळेच त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये केवळ परीक्षाभिमुख तयारी नव्हे, तर संशोधनाभिमुख विचारसरणी विकसित झाली.

अध्यापनाबरोबरच संशोधन हे प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांच्या शैक्षणिक जीवनाचे मुख्य केंद्र राहिले. समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, विकासाचे समाजशास्त्र, लिंगभाव आणि समाज तसेच वृद्धत्वाचे समाजशास्त्र ही त्यांची विशेष अभ्यासक्षेत्रे आहेत. या क्षेत्रांतील त्यांचे संशोधन केवळ सैद्धांतिक न राहता प्रत्यक्ष सामाजिक वास्तवाशी घट्ट जोडलेले आहे. कौटुंबिक बदल, शहरीकरण, औद्योगिकीकरण, महिलांचे सक्षमीकरण, वृद्धांचे प्रश्न, कौटुंबिक हिंसाचार आणि दारूबंदी चळवळ यांसारख्या विषयांवर त्यांनी केलेले संशोधन समाजातील बदलत्या प्रक्रिया स्पष्ट करणारे ठरत आहे.

विकासाचे समाजशास्त्र या क्षेत्रात त्यांनी विकास प्रक्रियेचा मानवी पैलू अधोरेखित केला. विकास म्हणजे केवळ आर्थिक वाढ नसून सामाजिक न्याय, समान संधी आणि मानवी सन्मान यांचा समतोल असावा, ही भूमिका त्यांनी सातत्याने मांडली. ग्रामीण आणि शहरी समाजातील विकासातील तफावत, स्वयं-सहायता गटांचे सामाजिक परिणाम आणि महिलांचे सक्षमीकरण यावरील त्यांच्या संशोधनातून विकासाच्या संकल्पनेला व्यापक अर्थ प्राप्त झाला आहे.

लिंगभाव आणि समाज या विषयावर त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. स्त्री-पुरुष समानता ही केवळ कायदेशीर तरतुदींमध्ये मर्यादित न राहता ती सामाजिक व्यवहारात कशी प्रकट होते, याचा त्यांनी सखोल अभ्यास केला. महिलांवरील हिंसाचार, कौटुंबिक नातेसंबंध, कामगार क्षेत्रातील महिलांची स्थिती आणि दारूबंदी चळवळीत महिलांची भूमिका अशा विषयांवरील त्यांच्या संशोधनातून लिंगभाव असमानतेची संरचनात्मक कारणे स्पष्ट झाली आहेत. त्यांच्या लेखनात स्त्री ही केवळ अभ्यासविषय न राहता सामाजिक परिवर्तनाची सक्रिय घटक म्हणून समोर आली आहे.

वृद्धत्वाचे समाजशास्त्र हा त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा आयाम आहे. बदलत्या कुटुंबव्यवस्थेमुळे वृद्धांच्या जीवनावर होणारे परिणाम, वृद्धाश्रमांची वाढ, वृद्धांचे सामाजिक-मानसिक प्रश्न आणि कौटुंबिक आधाराचा अभाव या विषयांवरील त्यांच्या संशोधनाने वृद्धत्वाच्या प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वेधले. वृद्ध ही केवळ कल्याणकारी योजनांची लक्ष्यगट नसून सन्मानाने जगण्याचा हक्क असलेली व्यक्ती आहे, ही भूमिका त्यांच्या संशोधनातून ठळकपणे व्यक्त झाली आहे.

संशोधन मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. एम. ए., एम.फिल. आणि पीएच.डी., आणि पोस्ट-डॉक्टोरेट (पी.डी.एफ.) स्तरावर त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. या संशोधन प्रबंधांचे विषय पाहिले, तर समाजातील विविध घटकांचे जीवनविश्व उलगडताना दिसते. दलित व मागासवर्गीय समाज, आदिवासी समुदाय, कामगार, महिला, वृद्ध, अपंग, विधीसंघर्षित बालके, पोलीस व्यवस्था, स्वयं-सहायता गट आणि विस्थापित लोकसंख्या इत्यादी. या संशोधनातून समाजातील संरचनात्मक विषमता, सामाजिक नियंत्रण आणि बदलत्या सामाजिक मूल्यांचे विश्लेषण झाले.

प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचे पोस्ट-डॉक्टोरेट (पी. डी.एफ.) संशोधनासाठी डॉ. राजेंद्र बगाटे यांना अनमोल मार्गदर्शन लाभले आहे, तर पीएच.डी. पदवी संशोधनासाठी डॉ. ए.डी. साबळे, डॉ. डी.एस. कोरे, डॉ. स्नेहलता मानकर, डॉ. नारायण बोराडे, डॉ. सुनिता अंकुश (वाघमारे), डॉ. डी.डी. घोडगे, डॉ. डी.एल. तोरवणे, डॉ. अरुंधती पाटील, डॉ. प्रशांत सोनवणे, डॉ. शिवकुमार सोळंके, डॉ. शोभा इंगळे, डॉ. राजेंद्र बगाटे, डॉ. आरती धनवे, डॉ. मंगलमुर्ती धोकटे, डॉ. संदीप चौधरी, डॉ. रुपसी दास, डॉ. गणेश मोकासरे, डॉ. रेवणनाथ काळे, डॉ. अंबिका दत्ता, डॉ. वैशाली जाधव, सुजाता पाटील आणि सविता कोटूरी इत्यादी संशोधकांना अनमोल मार्गदर्शन लाभले आणि लाभत आहे. तसेच अनेक माझ्यासह अनेक विद्यार्थ्यांना एम.फिल. पदवीसाठी अनमोल मार्गदर्शन लाभले आणि लाभत आहे.

मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक सूचना दिल्या नाहीत, तर संशोधनातील नैतिकता आणि सामाजिक जबाबदारीचे भान दिले. माहिती संकलन करताना प्रतिसादकर्त्यांचा सन्मान, निष्कर्ष मांडताना वस्तुनिष्ठता आणि निष्कर्षांचा समाजासाठी होणारा उपयोग या बाबींवर त्यांनी विशेष भर दिला आहे. त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले संशोधन केवळ विद्यापीठीय निकष पूर्ण करणारे न राहता समाजोपयोगी ठरत आहे.

पोस्ट-डॉक्टोरल (पी. डी.एफ.) संशोधन मार्गदर्शन हे प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांच्या शैक्षणिक कार्याचे वैशिष्ट्यपूर्ण अंग आहे. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (आय.सी.एस.एस. आर.), नवी दिल्ली अंतर्गत त्यांनी पोस्ट-डॉक्टोरल (पी. डी.एफ.) संशोधनासाठी डॉ. राजेंद्र बगाटे यांना ''प्रॉब्लेम्स ऑफ एल्डरली लिविंग इन ओल्ड एज होम्स इन महाराष्ट्रा' या वृद्धांशी संबंधित संशोधन विषयावर मार्गदर्शन केले आहे. महाराष्ट्रात समाजशास्त्र विषयातील पहिल्या पोस्ट-डॉक्टोरल संशोधनाची परंपरा घडवण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. वृद्धाश्रमातील वृद्धांचे सामाजिक, आर्थिक आणि मानसिक प्रश्न, त्यांची सामाजिक-मानसिक अवस्था, कौटुंबिक नात्यांतील बदल, कौटुंबिक आधाराचा अभाव आणि सामाजिक प्रतिष्ठेचे प्रश्न या विषयावर झालेल्या पोस्ट-डॉक्टोरल संशोधनातून समाजधोरणांसाठी उपयुक्त निष्कर्ष पुढे आले आहेत.

ग्रंथनिर्मिती आणि लेखन हे त्यांच्या शैक्षणिक योगदानाचे महत्त्वाचे साधन राहिले आहे. समाजशास्त्रीय संज्ञा, स्वयं-सहायता गट आणि लिंगभाव समता यांसारख्या विषयांवरील त्यांची पुस्तके विद्यार्थ्यांसाठी आणि संशोधकांसाठी मार्गदर्शक ठरली. मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांत त्यांनी लेखन केले असून, त्यामुळे स्थानिक सामाजिक प्रश्नांची मांडणी व्यापक शैक्षणिक वर्तुळात पोहोचली आहे. संशोधन नियतकालिके, संपादित ग्रंथ आणि परिषद कार्यवृत्तांमधील त्यांचे लेख समाजशास्त्रीय चर्चेला दिशा देणारे ठरले आहेत.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमधील सहभागाने त्यांच्या कार्याला व्यापक परिमाण लाभले. वृद्धत्व, लिंगभाव असमानता, विश्रांतीकालीन जीवन आणि सामाजिक विकास अशा विषयांवरील शोधनिबंध त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर सादर केले. या अनुभवांचा लाभ त्यांच्या अध्यापन आणि संशोधनात झाला आणि भारतीय समाजातील प्रश्नांचे जागतिक समाजशास्त्रीय चौकटीत विश्लेषण शक्य झाले.

समाजशास्त्र हे केवळ अकादमिक क्षेत्रापुरते मर्यादित नसून ते सामाजिक कृतीशी जोडलेले असावे, हा विश्वास त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिला. महिला संघटना, महिला सुरक्षा समित्या, जनशिक्षण संस्थान आणि ग्राहक चळवळीतील सहभागातून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. संशोधनातून निष्पन्न झालेले निष्कर्ष समाजकार्याच्या माध्यमातून प्रत्यक्ष समाजात उतरवण्याचा त्यांचा प्रयत्न सातत्याने दिसतो.

विद्यापीठीय प्रशासन आणि शिक्षक संघटनांमध्येही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. अनेक वर्ष त्या समाजशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख राहिल्या असून त्यांनी विद्यापीठांमध्ये अधिसभा सदस्यासह अनेक महत्वपूर्ण पदांवर काम केले आहे. या पदांवर असतांना त्यांनी विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यापैकी कुणालाही त्रास दिलेला नाही, तर प्रत्येकाच्या अडचणी समजून घेवून त्या सोडवल्या आहेत आणि आज पण सोडवत आहेत. शिक्षक संघटनेतील जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांनी शैक्षणिक लोकशाही, पारदर्शकता आणि सहकार्य या मूल्यांचा पुरस्कार केला. सहकारी आणि कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी त्या नेहमीच मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान राहिल्या आहेत.

प्रा. डॉ. स्मिता अवचार यांच्या कार्याचे सर्वात प्रभावी प्रतिबिंब म्हणजे गुरू-शिष्य परंपरा होय. गुरू म्हणून त्यांनी अधिकार गाजवण्याऐवजी विश्वास निर्माण केला. संशोधनातील अडचणी, क्षेत्रकार्याचे अनुभव आणि सैद्धांतिक संभ्रम या सर्व बाबींवर त्यांनी संयमाने मार्गदर्शन केले. त्यामुळेच त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये केवळ संशोधक नव्हे, तर सामाजिकदृष्ट्या जागरूक माणसे घडली आहेत.

या संदर्भात माझा म्हणजेच डॉ. राजेंद्र बगाटे यांचा वैयक्तिक अनुभव विशेष उल्लेखनीय ठरतो. एम.ए., नेट-जेआरएफ, एम.फिल., पीएच.डी. आणि पोस्ट-डॉक्टोरेट (पी.डी.एफ.) संशोधन या सर्व शैक्षणिक टप्प्यांवर एकाच गुरूच्या मार्गदर्शनाखाली घडणे ही दुर्मीळ बाब आहे. या संपूर्ण प्रवासात प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांनी केवळ संशोधनविषयक मार्गदर्शन केले नाही, तर शैक्षणिक प्रामाणिकपणा, सामाजिक संवेदनशीलता आणि माणुसकीची मूल्ये रुजवली आहेत. संशोधन म्हणजे केवळ पदवी मिळवणे नसून समाजासाठी काहीतरी देण्याची जबाबदारी आहे, ही शिकवण त्यांच्या मार्गदर्शनातून मिळाली आहे.

प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांना देण्यात आलेल्या जीवन गौरव पुरस्काराचे महत्त्व या सर्व पार्श्वभूमीवर अधिक खोलवर समजते. हा पुरस्कार म्हणजे प्रदीर्घ सेवेला दिलेला सन्मान असला, तरी तो समाजशास्त्र या विषयाच्या सामाजिक उपयोगितेची सार्वजनिक कबुली आहे. समाजातील दुर्बल घटकांचे प्रश्न, महिलांचे सक्षमीकरण, वृद्धांचे सन्मानजनक जीवन आणि विकासातील मानवी पैलू या सर्व विषयांना शास्त्रीय अधिष्ठान देण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले. त्याचीच ही औपचारिक पावती आहे.

समारोप करताना असे म्हणावे लागेल की, प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांना प्रदान करण्यात आलेला जीवन गौरव पुरस्कार हा त्यांच्या वैयक्तिक यशाचा क्षण असला, तरी तो महाराष्ट्रासह भारतातील समाजशास्त्र क्षेत्रासाठी अभिमानाचा क्षण आहे. समाजशास्त्राच्या माध्यमातून समाज अधिक समताधिष्ठित, संवेदनशील आणि न्याय्य व्हावा, या उद्देशाने त्यांनी जे कार्य केले, त्याची दखल या पुरस्कारातून घेतली गेली आहे. त्यांच्या ज्ञानाने, मार्गदर्शनाने आणि मूल्यांनी घडलेली पिढी हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे. समाजशास्त्राच्या सेवाव्रताचा हा प्रवास दीर्घकाळ प्रेरणादायी ठरो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
लेखक

# 'नवीन हर्पिक बाथरूम अल्ट्रा क्लीनर' ची सुरुवात; ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून रोहित शेट्टी यांचे स्वागत

भारतामधील क्रमांक १ टॉयलेट आणि बाथरूम क्लीनर असलेल्या हार्पिकने, ज्यावर देशातील १० कोटींहून अधिक घरांचा❋ विश्वास आहे, आपल्या बाथरूम स्वच्छतेतील आतापर्यंतचे सर्वात प्रगत उत्पादन 'नवीन हर्पिक बाथरूम अल्ट्रा क्लीनर' बाजारात आणल्याची घोषणा केली आहे. गेल्या दशकातील बाथरूम क्लीनिंग क्षेत्रातील हार्पिकची ही सर्वात मोठी नवकल्पकता मानली जात आहे. हट्टी आणि सर्वाधिक आढळणारे बाथरूममधील डाग प्रभावीपणे काढून संपूर्ण बाथरूम 'अल्ट्रा क्लीन' करण्यासाठी हे उत्पादन खास तयार करण्यात आले आहे. या उत्पादनाच्या दमदार आणि विश्वासार्ह डाग हटवण्याच्या वचनाला अधिक बळ देण्यासाठी बॉलिवूड दिग्दर्शक रोहित शेट्टी ब्रँड ॲम्बेसीडर म्हणून सहभागी झाला आहे.

भारतीय शहरांमधील अनेक घरांमध्ये बाथरूममध्ये पिवळे डाग, हार्ड वॉटरमुळे तयार होणारा थर (लाइमस्केल) आणि गंजासारखे हट्टी डाग ही मोठी समस्या असते. वेळ जसजसा जातो तसतसे लोकांना वाटू लागते की हे डाग काढणं जवळपास अशक्य आहे. यावर खात्रीशीर उपाय नसल्याने अनेकजण साधे डिटर्जंट, ब्लीच किंवा फिनाइलसारखी सर्वसाधारण उत्पादने वापरतात. पण ही उत्पादने हार्ड वॉटरच्या डागांवर फारसा परिणाम करत नाहीत आणि कधी कधी पृष्ठभागालाही घासून टाकतात, त्यामुळे बाथरूमचा लुक अधिकच निस्तेज दिसू लागतो.

ग्राहकांच्या या जुन्या आणि महत्त्वाच्या गरजेला उत्तर देत, विश्वासार्ह, बहुउपयोगी आणि परिणामकारक उपाय म्हणून 'नवीन हार्पिक बाथरूम अल्ट्रा क्लीनर' खास भारतीय बाथरूमची स्थिती लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे. भारतातील सर्वात दमदार डाग हटवणारा स्पेशालिस्ट म्हणून तो रोजचे पिवळे हार्ड वॉटरचे डाग, लाइमस्केल तसेच गंजासारखे हट्टी डागही प्रभावीपणे काढतो आणि बाथरूमला दिसायला अल्ट्रा साफ आणि चमकदार बनवतो. ''नवीन हार्पिक बाथरूम अल्ट्रा क्लीनर कसाही असो डाग, पूर्ण बाथरूम साफ'' या वचनाला साजेशी ही नवी मोहीम ग्राहकांना एक ताकदवान आणि खात्रीशीर उपाय देत बाथरूम क्लीनर श्रेणीत हार्पिकचे नेतृत्व अधिक मजबूत करते.

ब्रँडसोबतच्या आपल्या सहकार्याबद्दल बोलताना बॉलिवूड दिग्दर्शक रोहित शेट्टी म्हणाला, ''लोक तुम्हाला एका विशिष्ट शैलीशी जोडतात, याचा अर्थ ते तुमच्याकडून प्रत्येक वेळी दर्जेदार कामाची अपेक्षा करतात आणि तुमच्यावर विश्वास ठेवतात. तो विश्वासच तुम्हाला अधिक चांगलं काम करण्याची आणि स्वतःचा स्तर उंचावण्याची प्रेरणा देतो. मग ते कॉमेडी असो, ॲक्शन असो किंवा हार्पिकच्या बाबतीत भन्नाट स्वच्छता असो. स्वच्छतेच्या क्षेत्रात हर्पिक हे अनेक वर्षांपासून विश्वासाचं नाव आहे आणि बाथरूम हायजिनशी तर त्याचा अगदी जवळचाच संबंध जोडला गेला आहे. 'नवीन हर्पिक बाथरूम अल्ट्रा क्लीनर'मुळे हा ब्रँड बाथरूम स्वच्छतेला पुढच्या स्तरावर घेऊन जात आहे.

# जिद्दीच्या पंखांना बळदिव्यांग मुलांच्या क्रीडा स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## दिव्यांगांच्या कलागुणांना प्रोत्साहन द्यावे-जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

**आत्ताच एक्सप्रेस**

**परभणी –** दिव्यांग मुलांच्या अंगी दडलेल्या असामान्य क्षमतेला योग्य व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या आत्मविश्वासाला नवी दिशा मिळावी, या उदात्त हेतूने दिव्यांग मुला-मुलींच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. समाजाने त्यांच्या सामर्थ्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे आणि त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंहं चव्हाण यांनी केले.

जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग, जिल्हा परिषद, दिव्यांग शाळा व कर्मशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आज परभणी शहरातील प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडियम येथे दिव्यांग मुला-मुलींच्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा-२०२६चे उद्घाटन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या हस्ते पार पडले. यानिमित्त मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी बोलत होते. या कार्यक्रमास दिव्यांग विद्यार्थी व दिव्यांग बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला .

यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार, अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय डॉ. रविंद्र चव्हाण, प्रकल्प संचालक स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी जनार्दन पक्कान्ने, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी रावसाहेब चकोर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता प्रल्हाद लांडे यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले की, दिव्यांग विद्यार्थ्यांकडे सहानुभूतीने नव्हे, तर सन्मानाने पाहण्याची गरज आहे. त्यांच्या सामर्थ्याला योग्य दिशा दिल्यास ते समाजासाठी प्रेरणादायी ठरतील. दिव्यांग भवन उभारण्यासाठी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

श्रीमती नतिशा माथुर म्हणाल्या की, दिव्यांग बांधवांसाठी जिल्हा परिषदेच्या ५ टक्के शेष निधीतून विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये दिव्यांगांना आर्थिक मदत, दैनंदिन दिनचर्या समजत नसलेल्या दिव्यांगांसाठी काळजीवाहक निर्वाह भत्ता, सहायक उपकरणांसाठी आर्थिक सहाय्य, विनाअट घरकुल योजना, चालण्यात असमर्थ दिव्यांगांना व्यवसायासाठी ॲडॉप्शनसह स्कूटर उपलब्ध करून देणे, तसेच कौशल्य विकासासाठी अल्पमुदतीचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या दिव्यांगांना व्यवसायासाठी आर्थिक मदत देणे अशा पुनर्वसन व उपजीविकेची साधने निर्माण करणाऱ्या विविध योजना राबविल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हास्तरीय स्पर्धेत ३२ शाळांमधील एकूण ५३३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. धावणे, गोळाफेक, लाँग जंप अशा विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार



असून, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना भविष्यात नोकरीतील आरक्षणाचा लाभही मिळणार आहे.

कार्यक्रमास अधिकारी, कर्मचारी, पालक व दिव्यांग विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिद्द, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या बळावर दिव्यांग विद्यार्थ्यांनी आज जिल्हास्तरावर आपल्या सामर्थ्याचा ठसा उमटविला.

# जागेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे महसूलमंत्र्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश !

## पत्रकारांच्या शिष्टमंडळाने घेतली महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे ची मुंबईत भेट

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली जिल्ह्यातील पत्रकार वेल्फेअर सोसायटी कोअर कमिटीच्या शिष्टमंडळांनी २४ फेब्रुवारी रोजी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मुंबई येथील निवासस्थानी भेट घेतली यावेळी पत्रकारांच्या घराच्या जागे संदर्भात तात्काळ प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना दिले यावेळी हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे पाटील , माजी आमदार रामराव वडकुते यांच्यासह पत्रकार वेल्फेअर सोसायटीच्या शिष्टमंडळाचा समावेश होता. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निवासस्थानी हिंगोली जिल्ह्यातील पत्रकारांचे शिष्टमंडळानी मंगळवारी भेट असता पत्रकार वेल्फेअर सोसायटीच्या माध्यमातून जागेच्या मागणीचे निवेदन देण्यात आले असून निवेदनातील प्रमुख मागणी निवासासाठी जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भात असल्याने महसूल मंत्री बावनकुळे यांनी तो प्रस्ताव तात्काळ मंजूर करीत हिंगोली जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना तातडीने पत्रकारांच्या जागे संदर्भातला प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश दिले.यावेळी वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष कल्याण देशमुख , संचालक गजानन मगर,संतोष भिसे, प्रकाश इंगोले, संदीप नागरे ,रवी शिखरे ,विजय गुंडेकर संदीप पाचमासे यांची



उपस्थिती होती.

पत्रकारांच्या घराच्या जागी संदर्भातला प्रस्ताव जिल्हाधिकारी मार्फत शासनाकडे सादर होताच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थिती मुंबई येथे पुढील कारवाईसाठी बैठक होणार असल्याने हिंगोली जिल्ह्यातील पत्रकारांच्या घरांचा प्रश्न लवकरच मार्गी लागण्याच्या आशा पल्लवीत झाले आहेत.

# रमाई आवास योजनेच्या रक्कमे संदर्भात डेप्टी सीइओ नामदेव केंद्रे यांची घेतली पप्पू चव्हाण यांनी भेट

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** जिल्हा परिषद चे सिओ विवेक गायकवाड यांना घरकुल लाभार्थ्यासाठी आंदोलनाचे निवेदन दिले व पंचायत समिती गट विकास अधिकारी हिंगोली वानखेडे मॅडम यांच्या दालनात अर्ज स्वीकार करत असताना घरकुल प्रोजेक्ट ऑफिसर नामदेव केंद्रे येत्या आठ दिवसांमध्ये रमाई घरकुल योजनेचे पैसे पडण्याचे आश्वासन दिले आहे आठ दिवसांमध्ये पैसे नाही पडले तर जिल्हा परिषद कार्यालय यांच्यासमोर ठिय्या आंदोलन आयोजित केलेला आहे याची दक्षता स्वतः सीओ यांनी घेतलेली आहे व घरकुल प्रोजेक्टर ऑफिसर नामदेव केंद्रे यांनी स्वतः लक्ष देऊन या आठ दिवसाच्या आत सर्व रमाई आवास योजनेचे लाभार्थी यांना आठ दिवसात सर्व हप्ते पडतील असे आश्वासन दिलेले आहेत.निवेदन देत असताना भाजपा नेते पप्पू चव्हाण भांडेगाव सर्कलचे उत्तमराव जगताप ,युवा नेते राहुल खिल्लारे संजय चव्हाण सुमित घिक, गोपाळ मस्के, ऋषिकेश पोले पंचायत समितीचे सर्व कर्मचारी अधिकारी यांच्यासमोर केंद्रे नी सर्व इंजिनिअर यांना ठणकावून सांगितले आहे बळसोंड सर्कल मधील अंधारवाडी,कारवाडी,

बळसोंड जुने गाव व परिसर राहोली खुर्द राहोली बुद्रुक सवड दाटेगाव देऊळगाव रामा वरुड गवळी या नऊ गावांमध्ये लाभार्थ्यांना हप्ता पडेल याची नोंद बळसोंड सर्कलमधील रमाई आवास योजनेचे लाभार्थ्यांनी घ्यावी. त्यानंतर पंतप्रधान आवास योजना आठ दिवसात जर पैशाचे हप्ते जर नाही पडले तर पाच मार्च ला जिल्हा परिषद कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करणार आहे याचे निवेदन डेप्युटी सीईओ घरकुल प्रोजेक्टर नामदेव केंद्रे हिंगोली, गट विकास अधिकारी वानखेडे मॅडम यांना निवेदन दिलेले आहे.



# संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त वसतिगृहात स्वच्छता अभियान

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** नवीन मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, हिंगोली तसेच मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह, हिंगोली येथे संत गाडगेबाबा जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या निमित्ताने संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर वसतिगृह परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश दिला. यावेळी श्रीमती सुलोचना विष्णु ढोणे (गृहपाल) यांच्या मार्गदर्शनाखाली वसतिगृहातील सर्व कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# हरितीवाचन चळवळ व मराठवाडा साहित्य परिषद देगलूर यांच्या वतीने शहरात भव्य कवी संमेलनाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**



**देगलूर / धनाजी जोशी–** देगलूर, दि. २५ फेब्रुवारी २०२६ शहरातील साहित्यप्रेमींसाठी आनंदाची बातमी म्हणजे येत्या २५ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता देगलूर येथे एक जयप्रकाश नारायण सार्वजनिक वाचनालय सभागृह येथे भव्य कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हरिती वाचन चळवळ व मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून विविध विषयांवरील कवितांचा आस्वाद रसिकांना घेता येणार आहे. या कवी संमेलनात सहभागी कवी देगलूर येथील तसेच नवोदित कवी सहभागी होणार असून देशभक्ती, सामाजिक जाणीव, प्रेम, निसर्ग आणि विनोदी अशा विविध विषयांवरील कविता सादर केल्या जाणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान श. ल.नाईक असून महाराष्ट्र शासन बालकवी म्हणून पुरस्कार प्राप्त असलेले जेष्ठ कवी प्रमुख पाहुणे म्हणून शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक मेजवानीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. प्रस्तुत कार्यक्रम हा लोकनायक जयप्रकाश नारायण सार्वजनिक वाचनालय देगलूर येथे आयोजित करण्यात आले आहे.

# हिंगोली शहर पोलीस ठाण्याचे वतीने भारतीय विद्या मंदिर येथे विद्यार्थिनीशी संवाद



**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** आज दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी हिंगोली शहर पोलीस ठाण्याचे वतीने पोलीस निरीक्षक संदीप मोघे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून कायद्याची माहिती सांगितली आहे.

आज दिनांक २४ फेब्रुवारी रोजी १०.१५ ते ११.३० वा दरम्यान भारतीय विद्या मंदिर हिंगोली येथे इयत्ता ५ ते १० पर्यंतच्या च्या विदयार्थांना पो. नि . संदीप मोदे, मपोह ज्योती जोंधळे, चापोशी डावरे, पोलीस स्टेशन हिंगोली शहर असे सहभागी होऊन , सायबर फ्रॉड, इंटरनेट कायद्या विषयी माहिती दिली तसेच काही अडचण आल्यास डायल ११२ व सायबर हेल्पलाइन १९३० याबाबत माहिती दिली आहे . यावेळी भारतीय विद्या मंदिर चे प्राचार्य डॉ प्रकाश अंभोरे, कान्हेड , बांगर,अभिषेक बेंगाळ, घुगे सह विद्यार्थी उपस्थित होते.

# प्राचार्य बाबासाहेब इंगोले यांना नेपाळ येथील शब्द प्रतिभा बहुक्षेत्रीय सन्मान फाउंडेशेन पुरस्कार प्रदान

**आत्ताच एक्सप्रेस**



**हिंगोली–** प्रतिभा बहुक्षेत्रीय सन्मानफाउंडेशेन नेपाळ यांच्याकडून आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस २१फेब्रुवारी रोजी देण्यात येणारा मातृभाषा रत्न मानद उपाधी हा पुरस्कार हिंगोली जिल्ह्यातील अन्नपूर्णा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बासंबा चे प्राचार्य बाबासाहेब इंगोले यांना त्यांच्या शिक्षण ,लेखन आणि साहित्यातील योगदानाबद्दल शब्द प्रतिभा बहुत क्षेत्रीय सन्मान फाउंडेशन नेपाल या संस्थेचे अध्यक्ष आनंद गिरी मायाळू यांनी ऑनलाइन प्रदान करण्यात आला .

सदरील पुरस्कार मिळाल्याबद्दल बाबासाहेब इंगोले यांचे अन्नपूर्णा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जी.एम. वीरकुंवर, प्रा. विक्रम जावळे,एड. के जी आरगडे, एन.जी हजारे, नगरसेवक अमित काळसरे,विजयकुमार कांबळे, बी आर घोडके,मुख्याध्यापक डॉ.प्रकाश अंभोरे, सुभाष कळंबे, एड. महासेन प्रधान, भीमराव कुरवडे, सुभाष भिसे,विनीत उबाळे, अमर मोरे, दीक्षित इंगोले,माधव जाधव, राहुल घोंगडे, अन्नपूर्णा विद्यालय चा सर्व स्टाफ आदींनी अभिनंदन केले आहे.



# जिल्हाधिकारी कार्यालयात संत गाडगेबाबा महाराज यांना अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी नायब तहसीलदार डी. एस. जोशी, संतोष बोथीकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांनीही यावेळी संत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

# ओबीसी आरक्षणासाठी ५०% मर्यादा हटवा, घटनादुरुस्ती करा; बबनराव तायवाडेंचा केंद्र-राज्य सरकारला इशारा

**जनसंजीवनी वृत्तसेवा**

**मुंबई** –ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावरून पुन्हा एकदा राजकीय आणि सामाजिक पातळीवर हालचाली सुरू झाल्या आहेत. ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी केंद्र सरकारने तातडीने घटनादुरुस्ती करावी, अशी ठाम मागणी केली आहे. सध्याच्या संविधानिक तरतुदीनुसार प्रत्येक राज्य सरकार आपल्या राज्यातील ओबीसी लोकसंख्येच्या आधारावर आरक्षणाचा टक्का ठरवत आहे. त्यामुळे वेगवेगळ्या राज्यांत भिन्न निर्णय घेतले जात असून आरक्षणाचा प्रश्न गुंतागुंतीचा बनत असल्याचे त्यांनी नमूद केले.

तायवाडे यांनी सांगितले की, ओबीसी आरक्षणाचा पेच कायमचा सोडवायचा असेल तर केंद्राने एकसंध धोरण स्वीकारणे आवश्यक आहे. राज्य सरकारांनी केवळ चर्चा करून वेळ घालवू नये, तर या अधिवेशनातच ठराव मंजूर करून केंद्र सरकारकडे पाठवावा. त्यानंतर केंद्रानेही चालू अधिवेशनात घटनादुरुस्ती करून स्पष्ट तरतूद करावी, अशी त्यांची मागणी आहे. राज्य आणि केंद्र या दोन्ही स्तरांवर ठोस निर्णय न झाल्यामुळे ओबीसी समाजात संभ्रम आणि असंतोष वाढत असल्याचे त्यांनी म्हटले.

ओबीसी समाजाला खरोखर २७ टक्के आरक्षण द्यायचे आहे का, असा सवालही तायवाडे यांनी उपस्थित केला. त्यांचे म्हणणे आहे की, आरक्षणाचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित ठेवला गेला आहे. त्यामुळे शासनाची भूमिका काय आहे, याबाबत शंका निर्माण होत आहे. संविधानात ओबीसींना आरक्षणाची तरतूद आहे; मात्र किती टक्के द्यायचे याचा अधिकार राज्यांना देण्यात आला आहे. हीच तरतूद सध्या अडचणीचे कारण ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावर उपाय म्हणून त्यांनी संविधानातील कलम २४३ (ड) - ६ आणि २४३ (ट) - ६ मध्ये दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. या कलमांमध्ये स्पष्टपणे २७ टक्के आरक्षणाची अट नमूद केल्यास देशभरात एकसमान धोरण लागू होईल, असे त्यांचे मत आहे. घटनादुरुस्ती झाल्यास ५० टक्के आरक्षण मर्यादेची अडचणही दूर होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सध्याच्या कायदेशीर चौकटीमुळे न्यायालयीन वाद वाढत असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी प्रतिनिधित्वावर परिणाम होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

एकूणच, ओबीसी आरक्षणाचा मुद्दा केवळ राज्यापुरता मर्यादित न राहता राष्ट्रीय स्तरावर सोडवला जावा, अशी भूमिका ओबीसी महासंघाने घेतली आहे. घटनादुरुस्तीच्या माध्यमातून स्पष्ट आणि ठोस तरतूद केल्यास आरक्षणावरील वाद कायमचा मिटू शकतो, असा दावा तायवाडे यांनी केला.

आता राज्य सरकार अधिवेशनात ठराव मंजूर करते का आणि केंद्र सरकार त्यावर तातडीने कारवाई करते का, याकडे ओबीसी समाजाचे लक्ष लागले आहे.

दैनिक निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
परभणी-हिंगोली व नांदेड जिल्ह्यासाठी
पत्रकार पाहिजेत
महाराष्ट्रातील दै. आत्ताच एक्सप्रेस या लोकप्रिय वृत्तपत्राच्या परभणी-नांदेड व हिंगोली आवृत्तीसाठी तालुका व शहर पातळीवर अनुभवी किंवा नवीन पत्रकार नेमणे आहे. ज्यांना पत्रकारीता क्षेत्रात काम करण्याची आवड आहे अशा होतकरु पत्रकारांनी संपर्क करावा.
नांदेड जिल्हा : अर्धापुर, भोकर, बिलोली, देगलूर, हदगाव, हिमायतनगर, कंधार, लोहा, मुदखेड, मुखेड, नांदेड, नायगांव आणी उमरी
परभणी जिल्हा : परभणी, गंगाखेड, सोनपेठ, पाथरी, मानवत, पालम, सेलू, जिंतुर आणि पुर्णा
हिंगोली जिल्हा : हिगोली, कळमनुरी, वसमत, औंढा नागनाथ आणि सेनगाव
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे
आवृत्ती संपादक : आत्ताच एक्सप्रेस
संपादक : मराठीबाणा न्युज LIVE
अध्यक्ष : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,किनवट
संपर्क कार्यालय : उपजिल्हा रुग्णालय मार्ग,गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड
मो.9022822289, 7066650600
Email : attachexpressparbhani@gmail.com

# सर्व विभागांनी समन्वय ठेवून उद्दिष्टपूर्ती करावी-डॉ.निधी पांडे

## कृषी संलग्न विभागांचा सविस्तर आढावा; कृषी विभागाच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**नांदेड –** जिल्ह्यात कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या योजनांचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ मिळावा व दिलेली उद्दिष्टे विहित वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून कार्य करावे, अशा सूचना प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेच्या केंद्रीय नोडल अधिकारी तथा भारत सरकार राजभाषा विभागाच्या संयुक्त सचिव डॉ. निधी पांडे यांनी दिल्या.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात कृषी विभागाशी संलग्न विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. देशमुख, कृषी उपसंचालक श्री. वानखेडे, प्रकल्प उपसंचालक आत्मा अनिल शिरफुले, जलसंधारण अधिकारी कांबळे, रेशीम विभागाच्या तंत्र अधिकारी कांचन जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

डॉ. पांडे म्हणाल्या की, जिल्ह्यासाठी कृषी विभागाने तयार केलेल्या जिल्हा आराखड्यात आवश्यक त्या सुधारणा करून उद्दिष्टपूर्ती वेळेत करावी. तसेच यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीबाबत त्यांचा अभिप्राय व अडचणी जाणून घ्याव्यात. शेतकऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवून व्हॉट्सॲप गटांच्या माध्यमातून समन्वय साधावा व त्यांच्या समस्या तात्काळ सोडवाव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या. जिल्ह्यातील कृषी विभागाच्या कामकाजाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी कृषी विभागामार्फत जिल्ह्यात एआयचा वापर, चिया व मका लागवडीस प्रोत्साहन, १ लाख जलतारा उद्दिष्ट, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मोफत बियाणे वाटप, फार्मर कपतर्फे ५५० शेतकऱ्यांना तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण, महाडीबीटी अंतर्गत लाभ वितरण, यांत्रिकीकरण, तसेच रब्बी हंगामातील पेरणी आदी बाबींचे सादरीकरण करण्यात आले.

तसेच पशुसंवर्धन विभागाच्या योजना, महारेशीम अभियानाची उद्दिष्टपूर्ती, रेशीम शेतीचे फायदे, मत्स्यव्यवसाय विभागाची शेततळे व मत्स्यपालनातील कामगिरी, पशुसंवर्धनातील लसीकरण व दूध उत्पादनवाढीच्या उपाययोजना यांची माहिती देण्यात आली. यासोबत जिल्हा उपनिबंधक, ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा उद्योग केंद्र, फार्मर कप, सिंचन, जिल्हा जलसंधारण विभाग, नाबार्ड, कापूस संशोधन केंद्र, अग्रणी बँक आदी विभागांचाही सविस्तर आढावा घेण्यात आला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील सर्व विभागांचे काम सुव्यवस्थित सुरू असून पशुसंवर्धन विभागाचे कार्य विशेष प्रगतीपथावर असल्याचे नमूद केले. तसेच मत्स्यपालन क्षेत्रातही जनजागृती वाढताना दिसत असल्याचे सांगितले. सर्व योजनांचा लाभ तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विभागांचे सहकार्य आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.





''प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना'' अंतर्गत आज सकाळी नांदेड तालुक्यातील धनगरवाडी येथील रेशीम शेती व विविध केंद्र पुरस्कृत योजना याबाबत संयुक्त सचिव डॉ. निधी पांडे यांनी पाहणी दौरा केला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत व तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल व संपूर्ण चमू व रेशीम उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

## महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिव पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार व क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कारासाठी प्रस्ताव करण्यास मुदतवाढ

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

नांदेड – महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिव पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार व क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार सन २०२५-२६ वर्षासाठी व्यक्ती आणि संस्था यांना प्रस्ताव सादर करण्यासाठी २१ फेब्रुवारीपासून पुढे १० दिवसांची मुदतवाढ दिली आहे. तरी पात्र व इच्छुक व्यक्ती व संस्थांनी या पुरस्कारासाठी दिलेल्या मुदतीत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक सचिन खुणे यांनी केले आहे.




इतर मागास विकास विभागांतर्गत कार्यरत इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्या मार्फत संबंधित शासन निर्णय व शुद्धीपत्रकांनुसार विभागांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या वरील पुरस्कारांसाठी पात्र व इच्छुक व्यक्ती तसेच संबंधित समाजाच्या उत्थानासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांकडून रीतसर अर्ज मागविण्यात येत आहेत.

अटी व शर्ती

अर्जदार व्यक्ती/संस्था महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणे आवश्यक आहे. अर्जदाराने संबंधित समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अथवा इतर क्षेत्रातील उत्थानासाठी सलग व उल्लेखनीय कार्य केलेले असावे.

अर्ज विहित नमुन्यात सादर करणे बंधनकारक असून शासन निर्णयामध्ये नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे, कार्याचा सविस्तर अहवाल, शिफारसपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अपूर्ण, चुकीची माहिती असलेले अथवा मुदतीनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत. पुरस्काराबाबत अंतिम निर्णय शासन स्तरावर घेण्यात येईल व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

# दलीत वस्ती निधी अपहार प्रकरणी कारवाई कधी होणार

## दलित वस्ती निधी केला वन विभागाच्या हद्दीत खर्च वन विभाग ही झोपेत

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर –** भ्रष्टाचाराने पोखरलेल्या माहुर नगर पंचायतीचे मुख्याधिकारी आणि पदाधिकाऱ्यांनी संगणमताने दलीत वस्तीच्या नीधीचा अपहार केल्याप्रकरणी समाज कल्याण अधिकारी मिनगीरे यांनी याप्रकरणी पत्राद्वारे कारवाईचा इशारा दिला होता परंतु पंधरा दिवसाचा कालावधी उलटूनही अद्याप कारवाईला मुहूर्त न मिळाल्याने दलीत वस्तीच्या अपहार प्रकरणी कारवाई कधी होणार?असा प्रश्न जनतेतून उपस्थित केला जात असून वन विभागाच्या हद्दीत काम झाल्याची चर्चा होत असल्याने वनविभाग ही त्याप्रकरणी मौन धारण करून असल्याने शहरात विविध चर्चांना उधान आले आहे



शहरातील दलीत वस्तीच्या विकासासाठी शासनाकडून सुमारे दिड कोटींचा निधी पदाधिकारी व मुख्याधिकारी यांनी संगणमत करून दलीत वस्ती नसलेल्या अविनाश दत्तमंदिराकढे जाण्यासाठी सिसि रस्त्याच्या कामासाठी खर्च केला याबाबत मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी प्रसार माध्यमांना सदर काम नियमानुसार करण्यात आले असून त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाची मान्यता घेतल्याचै ठामपणे सांगितले होते. परंतु जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशात समाजकल्याण विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊनच कार्यारंभ आदेश द्यावे असे नमूद केले परंतु जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश डावलून समाज कल्याण विभागाचे नाहरकत न घेताच संबंधित कामाचा कार्यारंभ आदेश दिला एवढ्यावरच न थांबता गुत्तेदाराला सदर कामाची देयके अदा करुन दलीत वस्ती निधीचा बट्याबोळ केला.

याबाबत बहुजनांचे नेते तथा सामाजिक कार्यकर्ते केशव भगत यांनी समाज कल्याण अधिकारी नांदेड यांचेकडे तक्रार दाखल केली होती.त्यांच्या तक्रारीची दखल घेऊन मुख्याधिकारी नगर पंचायत माहुर यांना लेखी स्वरूपात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले त्यानुसार नगरपंचायतीने दिलेल्या अहवालानुसार समाज कल्याण विभागाचे नाहरकत घेतले नसल्याचे स्पष्ट झालेअसुन समाज कल्याण अधिकारी मिनगीरे यांनी याप्रकरणी कुठलीही नाहरकत परवानगी घेतली नसुन दलीतांच्या हक्काच्या वस्तीचा नीधी ईतरत्र खर्च केल्याप्रकरणी अनुसूचित जाती जमाती अन्याय अत्याचार कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे तक्रारदार केशव भगत यांना दिलेल्या पत्राद्वारे कळविले परंतु पंधरा दिवसाचा कालावधी उलटूनही अद्याप दोषींवर कुठलीही कारवाई झाली नसल्याने ''दालमे कुछ काला है'' अशी चर्चा ऐकावयास मिळत असुन समाज कल्याण अधिकारी भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालत असल्याची भावना जनतेतून व्यक्त केली जात आहे

## अवकाळी पाऊस व गारपीट मुळे झालेल्या नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्या!

### लक्ष्मीकांत आशीर्वाद पाटील यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन!

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** किनवट व माहूर तालुक्यात दि. २३फेब्रुवारी रोजी झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, सदरील नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देऊन दिलासा द्यावा अशी मागणी पिंटू (लक्ष्मीकांत)पाटील वायफनीकर यांनी नांदेड जिल्हाधिकाऱ्यांसह कृषी मंत्र्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

यंदाच्या वर्षात सुरुवातीपासूनच झालेल्या अतिवृष्टी सदृश्य पावसाने थैमान घातल्याने शेतकऱ्यांना आस्मानी संकटाचा कायम सामना करावा लागला आहे.

किनवट माहूर तालुक्यात अचानक झालेल्या अवकाळी पावसाने व गारपीटीमुळे गहू, मका, ज्वारी, हरभरा,यासह इतर ही पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांना पुन्हा एकदा आस्मानी संकटाचा सामना करावा लागत असून शेतकऱ्यांच्या आर्थिक संकटात भर पडत चालली आहे.

प्रशासनाने तात्काळ दखल घेत वादळी वाऱ्यासह गारपीटी मुळे सर्वत्र झालेल्या नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून तात्काळ आर्थिक मदत द्यावी अशी



अपेक्षा हवालदिल झालेला शेतकरी वर्ग बाळगून आहे.




## संविधानात गुरु रविदासांचा राज्य समाजवाद पण सत्ता कुणाच्या हातात?

### इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी उमरीच्या जयंतीत उपस्थित केला प्रश्न !

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

नांदेड – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात गुरु रविदासांचा राज्य समाजवाद समाविष्ट केला असला तरीही हे संविधान राबविणारी सत्ता कुणाच्या हातात आहे ? असा प्रश्न इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी उमरीच्या जयंतीत उपस्थित केला.

उमरी स्टेशन येथे वीर कक्कय्या आणि गुरु रविदास जयंती महोत्सवात अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे नेते इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर हे बोलत होते.

नांदेड जिल्ह्यातील उमरी स्टेशन येथे आयोजित वीर कक्कय्या व गुरु रविदास संयुक्त जयंती महोत्सवात सेवानिवृत्त पोलीस उपआयुक्त बालाजीराव सोनटक्के यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले व जाहिर सभा घेण्यात आली. यावेळी बालक बालकांनी आपले मनोगत मांडले. सूत्रसंचलन राहुल खंदारे आष्टीकर यांनी केले तर शेवटी संतोष भगवान सुर्यवंशी यांनी आभार मानले.

शेवटी प्रमुख वक्ता म्हणून इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी अध्यक्षीय समारोप केला. आपल्या परखड भाषणात ते पुढे म्हणाले की, तुलसीदास, रामदास, मनू महाराज या भारतातील कांही लोकांनी जाणीवपूर्वक माणसामाणसांत भेदभाव करणारी विषमतावादी व्यवस्था निर्माण केली होती. या व्यवस्थेच्या विरोधात विद्रोह पुकारुन गुरु रविदासांनी बंधुता, न्याय व समतेवर आधारित मानवतावादी विचारांची मांडणी केली. बेगमपूर राज्याची संकल्पना मांडली. यासाठी त्यांना बलिदान द्यावे लागले, समाजाने याची जाण ठेवली पाहिजे व लायक होण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आपण लायक होऊन सत्ता हस्तगत केल्याशिवाय संविधान पूर्णपणे लागू होऊ शकणार नाही. संविधान चांगले आहे पण सत्ता दुष्टांच्या हातात आहे. यामुळे गुरु रविदासांचे स्वप्न साकार होऊ शकणार नाही, म्हणून ग्रामपंचायत पासून ते संसदे पर्यंत आपले प्रतिनिधी निवडून गेले पाहिजे, म्हणून समाजाने चर्मोद्योग कमी करुन शासन प्रशासनात जाण्याचा प्रयत्न करावा असेही आवाहन शेवटी इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी केले.

मंचावर अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे विभागीय युवा प्रवक्ता चंद्रसेन गंगासागरे (घुंगराळा), लोहा तालुकाध्यक्ष लक्ष्मण फुलवरे, उमरी तालुकाध्यक्ष देविदास गंगासागरे, बहुजन समाज पक्षाचे जिल्हा महासचिव सुधाकर सरोदे (नांदेड), उमरीचे नगरसेवक साईनाथ जमदाडे, सामाजिक कार्यकर्ते नागेश भालके (नायगाव), ॲड . विश्वनाथ अहिले, गंगाधर गंगासागरे, संभाजी सुर्यवंशी, भगवान सुर्यवंशी, देविदास सुर्यवंशी, स्वागताध्यक्ष संजीव सवाई, मिलिंद सोनकांबळे आदींची प्रमुख उपस्थिती यावेळी होती.

सर्वप्रथम वीर कक्कय्या आणि गुरु रविदास यांच्या प्रतिमेची शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. स्नेहभोजनंतर कार्यक्रमाची सांगता झाली.



## उमरी नगरपरिषदेकडून थकीत मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीसाठी धडक कारवाई

* आत्ताच एक्सप्रेस

**सुमन पोलशेटवार**

**उमरी –** उमरी नगरपरिषद हद्दीतील आर्थिक वर्ष २०२५२६ मध्ये आतापर्यंत केवळ सुमारे ४५ टक्के मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला आहे. थकीत रकमेची वसुली करण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने तीन विशेष पथकांची नियुक्ती करून वसुली मोहीम तीव्र केली आहे.

दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी कारवाईदरम्यान थकीत करदारांच्या ५ गाळ्यांना सील करण्यात आले तसेच १० पाणी नळ जोडण्या बंद करण्यात आल्या. यापैकी काही नागरिकांनी तात्काळ थकबाकी भरल्यानंतर संबंधित सील काढण्यात आले व नळ जोडण्या पुन्हा सुरू करण्यात आल्या.

नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, मालमत्ता कर व इतर करांचा भरणा न करणाऱ्या नागरिकांवर पुढील कारवाई करण्यात येईल. प्रथम नळ जोडण्या बंद करण्यात येतील. त्यानंतरही कर न भरल्यास जप्ती अधिपत्र बजावून मालमत्ता जप्त करण्यात येईल व संबंधित मालमत्तेचा जाहीर लिलाव करण्यात येणार आहे. सदर कठोर कारवाई टाळण्यासाठी उमरी शहरातील नागरिकांनी आपल्या मालमत्ता कर व इतर करांची थकबाकी तात्काळ भरावी, असे आवाहन उमरी नगरपरिषद मुख्याधिकारी यांनी केले आहे.

## बाबा सोनापीर उर्स निमित्त आढावा बैठक, माहूरच्या तहसील कार्यालयात आढावा बैठकीचे आयोजन

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**



**श्रीक्षेत्र माहूर –** माहूर शहरातील सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या बाबा सोनापीर दर्गाह येथे दरवर्षीप्रमाणे साजरा होणाऱ्या उर्स निमित्त माहूरच्या तहसील कार्यालयात तहसीलदार अभिजीत जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत दि २६ रोजी ११.०० वाजता आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले असून सर्व अधिकारी पदाधिकारी पत्रकार बांधवांनी या बैठकीत उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे

सुफी संत बाबा सोनापीर दर्गाह येथे दरवर्षी ५ मार्च ते १० मार्च पर्यंत ऊर्सचे आयोजन केले जाते या उर्सात सर्व धर्मीय नागरिक दर्शनासह मनोरंजनाच्या कार्यक्रमाचा लहान मुलांना लाभ व्हावा मनसोक्त आनंद लुटता यावा यासाठी हजारोंच्या संख्येने पाचही दिवस गर्दी करत असतात त्यामुळे येथे सर्व शासकीय विभागांनी आपापल्या सुविधा द्याव्यात भाविकांना कुठलाही त्रास होऊ नये यासाठी आढावा बैठकीचे आयोजन तहसील कार्यालयात करण्यात आलेले आहे

आढावा बैठकीत सर्व विभाग प्रमुख कर्मचाऱ्यांनी तसेच पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन तहसीलदार अभिजीत जगताप नायब तहसीलदार कैलास जेठे यांचे सह अधिकाऱ्यांनी केले आहे.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813